4th Meeting

(15)

**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची चौथी मासिक बैठक.**

**दिनांक 24/01/2017**

**स्थळ:- विभागीय आयुक्त कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. 24/01/2017 रोजी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. विभागीय आयुक्त यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि सभेला सुरुवात केली. विभागीय आयुक्त यांनी प्रथम मागील तिसऱ्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आलेल्या मुद्दयाच्या अनुपालन अहवालाचा आढावा घेतला. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कारवाई | अंमलबजावणी करणारी यंत्रणा. |
|---|---|---|---|
| 1. | Brief Document तयार करणे. | विभागीय आयुक्त यांनी Brief Document संदर्भात आढावा घेतला. जिल्हाधिकारी सर्व यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाणथळाचे Brief Document तयार करुन ते पर्यावरण विभागाला पुढील कार्यवाही करिता सादर केले आहे अशी माहिती सभेमध्ये दिली. अध्यक्षांनी पर्यावरण विभागाला सादर केलेल्या अहवालाची प्रत सादर करण्याच्या सुचना दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग. |
| 2. | सदर समितीचा (कोकण वेटलँड तक्रार निवारण समिती) प्रचार व प्रसिद्धी करणे. | विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी सर्व तसेच सर्व समिती सदस्य सर्व यांनी पाणथळ तक्रार निवारण समिती स्थापन झाल्याबाबत त्यांच्या वेबसाईटवरती जनतेकरिता माहिती उपलब्ध केली किंवा कसे याचा आढावा घेतला आणि त्याचा अहवाल तातडीने या जानेवारी 2017 महिन्याअखेर समिती 'सदस्य सचिव' यांना सादर करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. जर संबंधित विभागाने त्यांच्या वेबसाईटवरती माहिती उपलब्ध केली नसेल तर ती तातडीने वेबसाईटवर उपलब्ध करुन त्याचा अहवाल जानेवारी 2017 या महिन्याअखेर सादर करण्याची सुचना अध्यक्षांनी दिली. | जिल्हाधिकारी सर्व<br>समिती सदस्य सर्व |
| | | 2. वेटलँडच्या तक्रारी दाखल करण्याकरिता तात्पुरत्यास्वरुपात kokanwetland@gmail.com हा ई-मेल आयडी तयार करण्यात आला असून | समिती सदस्य सर्व. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्याची माहिती जनतेकरिता उपलब्ध करून द्यावी.<br><br>3. सदर ई-मेल आयडीवर प्राप्त होणाऱ्या तक्रारी संबंधित विभागाला पाठवून त्यांच्याकडून करण्यात येणाऱ्या कारवाईचा अहवाल पुढील सभेमध्ये सादर करावा. | <br><br><br>'समिती सदस्य सचिव'. |
| 3 | जनहित याचिका क्र. 87/2013 मा. उच्च न्यायालयाच्या अंमलबजावणीसाठी मा. न्यायालय अंतरिम निर्णयातील अंमलबजावणी करावयाच्या आदेशांची यादी तयार करणे. | समिती "सदस्य सचिव" यांनी उपलब्ध करून दिलेल्या आदेशाच्या सविस्तर टिपणीनुसार प्रत्येक विभागाने पाणथळाचे संरक्षण करण्याकरीता उपाययोजना कराव्यात. | सर्व समिती सदस्य |
| 4 | विविध ठिकाणी होणाऱ्या वेटलँडच्या ऱ्हासाबद्दल आढावा घेणे. | मौजे मालाड येथील नेव्हीच्या जागी होणाऱ्या अतिक्रमणा संबंधी स्थळपाहणी करून अहवाल सादर करण्याची सूचना देण्यात आली होती. सदर ठिकाणी होणाऱ्या पाणशळाच्या अतिक्रमणासंदर्भात मा. उच्च न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला असून उच्च न्यायालयाने 30 नोव्हेंबर 2016 रोजी दिलेल्या निर्णयानुसार 2 महिन्याच्या आत चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश समितीस दिले होते. विभागीय आयुक्त यांनी कारवाईची मुदत जानेवारी अखेर संपत असल्यास मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांना कारवाई करून तातडीने या महिन्याअखेर सविस्तर अहवाल सादर करण्याची सुचना दिली आहे. तसेच संबंधित यंत्रणेने विविध विभागाकडून परवानगी घेतली किंवा नाही याबाबत चौकशी करावी, तसेच विविध विभागाची (महसुल, वन, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB, MCZMA) संयुक्त बैठक दि. 27/01/2017 रोजी आयोजित करावी. जर परवानगी घेतली नसेल तर संबंधित यंत्रणेविरुद्ध योग्य ती कारवाई करण्याच्या सुचना अध्यक्षांनी दिल्या आहेत. याशिवाय जिल्हाधिकारी यांनी केलेला चौकशीचा अहवाल तातडीने समितीस उपलब्ध करून द्यावा. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | सभेकरिता जबाबदार अधिकाऱ्यांची (Nodal Officer) नियुक्ती करणे, त्यांचे ई-मेल आयडी, संपर्क पत्ता समितीस उपलब्ध करुन देणे. | विभागीय आयुक्त यांनी मागील बैठकीचे मंजुर इतिवृत्तानुसार पुढील सभेला येताना त्यांचा अनुपालन अहवाल सादर करण्याच्या सुचना संबंधित विभागाला दिल्या. याशिवाय त्या त्या विभागाला जबाबदार अधिकाऱ्याची (Nodal Officer) माहिती तसेच ई-मेल आयडी उपलब्ध करुन देण्याबाबत देखील सुचना दिल्या आहेत.<br><br>2. तसेच संबंधित विभागाचे नियुक्त केलेले Nodal Officer यांनी सभेला उपस्थित राहण्याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाच्या प्रमुखाची राहील. | समिती सदस्य.<br><br>समिती सदस्य. |

यानंतर अध्यक्षांनी चौथ्या बैठकीच्या विषय पत्रिकानुसार मुद्दयांचा आढावा घेतला. तसेच मुद्देनिहाय सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | वेटलँड ऱ्हासाच्या तक्रारी व करावयाची कारवाई. | वेटलँडच्या ऱ्हासाबाबत समिती सदस्य सचिव यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला. समिती "सदस्य सचिव" यांनी प्राप्त झालेल्या तक्रारी त्यांचे कार्यक्षेत्र येत नसल्यामुळे जिल्हाधिकारी पालघर, उपायुक्त वसई विरार महानगरपालिका यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेल्या आहेत. यावर उपविभागीय अधिकारी पालघर यांनी मौजे भुईगाव येथील पाणथळावर होणाऱ्या अतिक्रमणाच्या तक्रारीच्या अनुषंगाने महसुल विभाग, महानगरपालिका यांच्यासह संयुक्त चौकशी केलेली असुन तेथील काही अतिक्रमण निष्कासित केलेले आहे व काही करावयाचे आहे. उर्वरित अतिक्रमण निष्कासित करण्यापुर्वी दिवाणी न्यायालयाने कारवाईवर स्थगिती दिली असल्याने निष्कासनाची कार्यवाही केलेली नाही. विभागीय आयुक्तांनी आपण केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल सादर करण्याची सुचना दिलेली आहे. | जिल्हाधिकारी पालघर. |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | वनशक्तीया अशासकिय संस्थेने वेटलँड संरक्षणा संदर्भात सुचविलेले उपाययोजना. | वनशक्ती या अशासकीय संस्था यांनी मौजे भांडुप येथील पाणथळ क्षेत्रामध्ये कचरा, प्लॅस्टिक यांच्यामुळे पाणी दुषित होत असल्याबाबत समितीस निदर्शनास आणून दिले. तसेच वनशक्ति यांनी उपाययोजना करण्याकरिता नाल्यावर काही ठराविक अंतरावर जाळी लावल्यास त्यामध्ये प्लॅस्टिक व कचरा अडविता येईल व एकत्र करुन त्यांची विल्हेवाट लावता येईल आणि पाणथळामधील पाणी दुषित होणार नाही अशी कल्पना मांडली. | |
| | | 1. विभागीय आयुक्त, तथा अध्यक्ष यांनी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई आणि वनशक्ती या अशासकीय संस्था यांनी एकत्रपणे स्थळपाहणी करुन असे एक क्षेत्र निवडावे आणि त्यानंतर त्याठिकाणी प्रथमतः पथदर्शी तत्त्वावर प्रयोग करुन ते कितपत यशस्वी होत आहे याचा आढावा घ्यावा व त्यानंतर प्रयोगाच्या यशस्वीतेच्या आधारावर पुढील निर्णय घेण्यात येईल असे अध्यक्षांनी नमुद केले. | मुंबई महानगरपालिका, नवीमुंबई महानगरपालिका, वनशक्ती अशासकीय संस्था. |
| | | 2.वनशक्ती या प्रशासकीय संस्थेने पाणथळाच्या ऱ्हासाबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने करावयाच्या स्थळपाहणीचा अहवाल तयार करण्याकरिता एक प्रपत्र उपलब्ध करुन दिले. त्यावर पाणथळ तज्ञ म्हणून नियुक्त समिती सदस्य यांनी सदर प्रपत्रात अंशतः बदल करण्याची विनंती केली. अध्यक्षांनी संबंधित सदस्य यांनी सुचविलेल्या सुचनांचा अंतरभाव करुन् प्रपत्र तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच ते मान्यतेसाठी सादर करण्याच्या सुचना दिल्या. | समिती सचिव |

सदर सभेस उपस्थित असणाऱ्या सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग